दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५४ वा | सोमवार दि. १० जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## आमदार अपात्र प्रकरण:नार्वेकरांनी घेतला मोठा निर्णय



**मुंबई ।** सत्तासंघर्षाच्या निकालानंतर आता विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह १५ आमदार आणि उद्धव ठाकरे गटातील १४ आमदारांना अपात्रता प्रकरणात नोटीसा बजावल्या आहेत. तर सात दिवसात त्यावर मत मांडण्याचे सांगितले आहे. त्यातच आता या कार्यवाहीला गती येवू लागली आहे. आता नार्वेकरांनी दुसरा मोठा निर्णय घेतला आहे. जर आमदारांना लेखी उत्तरे देता आले नाही. तर त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडता येणार आहे.

## न्यूज कॉलम

### श्रीराम फायनान्सची १८ लाखात फसवणूक

**धुळे ।** श्रीराम फायनान्स कंपनीची १८ लाख रुपयांत फसवणूक केल्याच्या संशयावरुन सहायक व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. कंपनीतर्फे विजय अशोक पाटील (यांनी पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार संशयित प्रदीप रमेश कापडी हा कंपनीच्या शिरपूर शाखेत असिस्टंट प्रॉडक्ट मॅनेजर होता.त्याने १८ लाख ६० हजार ९२ रुपयांचा अपहार केला.

## मंत्री येणार.. रस्ते चकाचक! : मुख्यमंत्री साहेब इकडे जरा लक्ष द्या : मनपा प्रशासनाला आली जाग

**धुळे । पुरुषोत्तम पाटील**







### अपघाताचा धोका

बाफना शाळेजवळ पुलाचे काम सुरु आहे. मात्र या ठिकाणी लावण्यात आल्या बांधकामाच्या दांड्याला बॅनर बांधण्यात आले आहे. यामुळे अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे. तसेच सोमवारी नियमित शाळा सुरु होईल. त्यावेळी या ठिकाणी विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. तसेच वाहतूक कोंडी देखील मोठ्या प्रमाणात होते.

शहरातील संतोषी माता चौक ते गणपती मंदिर, महाकाली मंदिर या मार्गावर गेल्या काही महिन्यांपासून रस्ते हे खड्ड्यांचे रस्ते बनले होते. मुख्यमंत्र्यांच्या दोऱ्यानिमित्त हे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला. तो फसला. आता याच खड्ड्यांचे डांबरी पॅचवर्क करण्यात येत आहे. खड्ड्यांच्या ठिकाणी व्यवस्थित खोदकाम करून तेथे डांबरी पॅचवर्क केला तर तो जास्त काळ टिकतो; पण येथे तसे न करता खड्ड्यांतील मुरुमावरच डांबराचा पॅचवर्क देऊन काम उरकण्याचा प्रयत्न महापालिकेकडून केला जात आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे.

शहरातील मुख्य रस्ते डांबरी करण केलेले आहेत. पावसामुळे शहरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. यामुळे नागरिकांना वाहतुकीदरम्यान अडचणी येत आहेत. ज्या ठिकाणी रस्त्यावर खड्डा आहे तो खड्डा व्यवस्थित खोदून त्यात खडी टाकून नंतर कच व डांबराचा वापर करून तो दुरुस्त करणे आवश्यक आहे. पण सध्या कंत्राटदारांकडून ओबडधोबड करण्याचा प्रकार सुरू आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी काम होत आहे त्या ठिकाणी रस्त्यावर खडीच खडी पसरल्याचे चित्र दिसत आहे. या खडीचाही वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व प्रकाराकडे अभियंत्यांचे दुर्लक्ष होत आहे.

**रात्री उशिरापर्यंत सुशोभीकर**

धुळे शहरात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी हा कार्यक्रम आज संपन्न होणार असून दोन्ही प्रमुख नेत्यांच्या स्वागतासाठी शहरात जय्यत तयारी करण्यात आली आहे. तसेच रात्री उपशिरापर्यंत मनपाचे शोभीकर करण्याचे काम सुरु होते. तसेच रस्ते देखील खड्डेबुजविण्याचा प्रयत्न केला जात होता.

# आधी पक्ष फोडला जायचा, आता पळवला जातोय; पवारांच्या बंडावर ठाकरेंची टीका

**मुंबई । प्रतिनिधी**



### अजित पवारांवर निशाणा...

**यावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदावरुन अजित पवारांवरही अप्रत्यक्ष निशाणा साधला. सध्या सगळ्यांनाच मुख्यमंत्री व्हायचे आहे. मात्र त्यामुळे शेतकऱ्यांना काय मिळणार, हे कोण बघणार, असे म्हणत सत्तेची साठमारी होत आहे यामध्ये शेतकरी भरडला जातोय.. असेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. दरम्यान, उद्धव ठाकरे पहिल्या टप्प्यात विदर्भातील यवतमाळ, वाशीम, अमरावती, अकोला आणि नागपूर या पाच जिल्ह्यातील जनतेशी संवाद साधणार आहे. यावेळी शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत.**

गेल्यावर्षी शिवसेनेत एकनाथ शिंदे यांच्यासह ४० पेक्षा अधिक आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवत वेगळा गट तयार केला. या घटनेला एक वर्षे पूर्ण होत नाही तो अशीच बंडखोरी राष्ट्रवादीत पाहायला मिळत आहे. अजित पवार यांनी ३० पेक्षा अधिक आमदारांना सोबत घेऊन शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. दरम्यान यावरूनच उद्धव ठाकरे यांनी पुन्हा भाजपवर निशाणा साधला आहे. आधी पक्षातील लोकं फुटायचे आता पक्ष पळवला जातोय, असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला आहे. यवतमाळ येथे माध्यमांशी ते संवाद साधत असून, यावेळी त्यांनी ही टीका केली आहे.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सध्याची राजकीय परिस्थिती जशी दिसतेय तशी पाहतोय. राजकारणात फोडाफोडीचे प्रकार काही नवीन नाहीत. पण यापूर्वी पक्ष फोडला जात होता, मात्र आता पक्ष पळवला जात आहे. विशेष म्हणजे, पक्ष पळवल्यानंतर सुद्धा आम्हाला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत माझ्या ज्या काही सभा झाल्या, तसेच इथे येताना रस्त्यात जागोजागी लोकं थांबलेली होती. प्रत्येक ठिकाणी गेल्यावर लोकं येऊन सांगत आहे की, जे काही घडतंय ते वाईट आहे. ही परंपरा, पायंडा महाराष्ट्रासाठी वाईट आहे. पण तुम्ही काळजी करू नका, आम्ही तुमच्या सोबत असल्याचे लोकं सांगत, असल्याचं ठाकरे म्हणाले. शिंदे गटाच्या १६ आमदारांना विधानसभा अध्यक्षांनी नोटीस बजावली असल्याच्या प्रश्नाला उत्तर देतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, याचा काहीही राजकीय अर्थ काढण्याचा प्रयत्न केला तर, सुप्रीम कोर्टाने जो अर्थ काढून दिला आहे त्याच्या पलीकडे कोणालही पाहता येणार नाही. न्यायालयाने अत्यंत स्वच्छ आणि स्पष्ट शब्दात त्यांचा निकाल दिला आहे. त्या निकालच्या चौकटीतच विधानसभा अध्यक्षांना निर्णय घ्यावा लागणार आहे. जर त्यांनी त्या चौकटीच्या बाहेर निर्णय दिला तर ते लोकशाहीला धरून होणार नाही, असेही ठाकरे म्हणाले.

शरद पवार यांनी नाशिकमधून आपला महाराष्ट्र दौरा सुरू केला आहे. तर, उद्धव ठाकरे हे आज विदर्भापासून आपल्या दौऱ्याला सुरूवात करत आहेत. महाराष्ट्राच्या दोन विरोधी टोकांकडून दौऱ्याला सुरूवात करत बंडखोरांविरोधात जनमत निर्माण करण्याचा उद्धव ठाकरे व शरद पवार यांचा प्रयत्न आहे. उद्धव ठाकरे आज आपल्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात यवतमाळ, वाशीम, अमरावती, अकोला आणि नागपूर या पाच जिल्ह्यांतील शिवसैनिकांशी संवाद साधणार असून प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. या दौऱ्यासाठी विदर्भातील शिवसैनिकांनीही जय्यत तयारी केली.

# पासेस असून एस.टी.बस सेवेअभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

**धुळे । प्रतिनिधी**



### वेळा प्रमाणे बस सुरू करावी

- दसवेल ते होळ-
- पहिली फेरी - सकाळी ७.०० वाजता
- दुसरी फेरी - दुपारी १२.००
- होळ ते दसवेल -
- पहिली फेरी - दुपारी १२.००
- दुसरी फेरी - संध्याकाळी ५

### शिंदखेडा आगार प्रमुखाचे दुर्लक्ष

शिंदखेडा आगार प्रमुखांना वारंवार अर्ज करून देखील नियमित वेळेवर बस सुरू झालेली नाही.तसेच विद्यार्थ्यांच्या पासेस काढलेल्या आहेत. तरी ह्या माध्यमिक शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये त्यांची गैरसोय होऊ नये. म्हणून प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी व खालील वेळेनुसार बस सुरू करावी.

### आंदोलन केले जाईल

**सकाळची बस बंद असल्याने विद्यार्थ्यांना शाळेला जाण्यासाठी अडचण येते. बसअभावी अनेक मुलींचे शिक्षण बंद होण्याची वेळ आली आहे. वारंवार अर्ज विनंती करूनदेखील कोणतीही दखल घेतली जात नाही. लवकरात लवकर सदर बस सुरू केली नाही, तर विद्यार्थ्यांसह रस्त्यावर आंदोलन केले जाईल.**

धुळे जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी शाळांच्या वेळांनुसार विशेष बस सोडल्या जात असल्या तरीही दसवेल गावाचे विद्यार्थी पंचमासिकाची रक्कम भरूनही त्यांना अद्याप पास मिळाले पण बस मिळाली नाही. तसेच त्यांच्या साठी वेळेवर बस उपलब्ध न होत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान देखील होते आहे. यामुळे परिसरातील पालकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.

बस फेरीची वाट पाहात अनेक पासधारक विद्यार्थी तथा प्रवासी तासन्तास प्रवासी थांब्यावर सदरची वाट पाहत थांबलेले असतात. शिंदखेडा तालुक्यातील दसवेल गावाचे ५ वी ते १० वी चे विद्यार्थी हे कृषी माध्यमिक विद्यालय होळ या शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यामुळे बस व्यस्था करण्यात यावी. तसेच दुपारच्या सत्रात ८ वी ते १० वी चे विद्यार्थी शिक्षण घेतात. तरी त्यांना वेळेत बस उपलब्ध व्हावी अशी मागणी होते आहे. विद्यार्थ्यांना बस न आल्याने पायी प्रवास करावा लागत आहे. अनेक प्रवाशांची तारांबळ उडाली आहे. आगाराकडून आपल्या भोंगळ कारभाराचा प्रत्यय प्रवासी वर्गांना वारंवार देण्यात येत असून विद्यार्थ्यांना सुद्धा वेठीस धरण्याचा प्रकार दिसून येत आहे. शाळा महाविद्यालये विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील एक आशेचा किरण असताना व ग्रामीण भागातील बस फेरीचे विद्यार्थ्यांच्या पासेस काढण्यासाठी देखील पालक तयार असताना सुद्धा आगार प्रमुख दुर्लक्ष करत आहेत. तरी संबंधित वरिष्ठ अधिकारी यांनी या प्रकाराकडे लक्ष देऊन विद्यार्थी प्रवास यांची होत असलेली गैरसोय टाळावी अशी मागणी विद्यार्थी प्रवासी यांच्याकडून होत आहे.

# वीरजवान मनोज माळी यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार

**धुळे । प्रतिनिधी**



'अमर रहे, अमर रहे वीर जवान मनोज माळी अमर रहे'च्या घोषात आज सकाळी वाघाडी, ता. शिरपूर येथे वीर जवान मनोज माळी यांना हजारो नागरिकांनी साश्रूपूर्ण नयनांनी अखेरचा निरोप दिला. भारतीय सैन्य दलात सिक्कीम येथे कार्यरत लान्सनायक मनोज माळी यांना ६ जुलै, २०२३ रोजी सिक्कीम येथे उंच डोंगराळ प्रदेशात कर्तव्य बजावत असतांना त्यांचा अचानक पाय घसरला आणि थेट ५०० ते ६०० फुट खोल दरीत कोसळून जखमी होऊन वीरमरण आले. त्यांचे पार्थिव आज सकाळी वाघाडी, ता. शिरपूर येथे आणण्यात आले. त्यानंतर सजविलेल्या वाहनातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. यानिमित्त ग्रामस्थांनी अंगणात रांगोळ्या रेखाटल्या होत्या. शालेय विद्यार्थी हातात तिरंगा घेवून 'अमर रहे, अमर रहे..... वीर जवान मनोज माळी अमर रहे'सह भारत माता की जय, वंदे मातरमच्या घोषणा देत होते.

वीर जवान मनोज माळी यांचे पार्थिव अंत्यसंस्काराच्या ठिकाणी आल्यानंतर आमदार काशिराम पावरा, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा मेजर डॉ. निलेश पाटील, तहसीलदार महेंद्र माळी, भूपेशभाई पटेल, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ तुषार रंधे, सैनिक कल्याण संघटक रामदास पाटील यांचेसह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलिस दल आणि सैन्य दलाच्या तुकडीने हवेत गोळीबाराच्या तीन फैरी झाडत मानवंदना दिली.

# शिरपूर -चोपडा रस्त्यावर अपघात

### ट्रकच्या धडकेत मिनीट्रक मधील ९ कामगार जखमी

**धुळे । प्रतिनिधी**



टेक्स्टाईल कंपनीत कामाला जाणाऱ्या कामगारांच्या वाहनाला मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. रविवारी दुपारी झालेल्या अपघातात ९ जण जखमी झाले असून त्यांना शिरपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. चोपडा-शहादा रस्त्यावरील मिल्ट्री स्कुल जवळ मिनी ट्रकला टाटा भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने मागून धडक दिली.

अपघातात मिनीट्रक मधील नऊ जण जखमी झाले. टेक्स्टाईल कंपनीत कामाला असलेले कामगार मिनीट्रकने कामावर जात होते. मिल्ट्री स्कुल जवळ गतीरोधक आल्याने मिनीट्रक चालकाने वाहनाचा वेग कमी केला. त्याच वेळी चोपड्याहून शिरपूरच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या ट्रकने मिनीट्रकला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात राहुल भगवान वाघ (वय ३०), प्रकाश गुलाब चव्हाण (वय २७), चालक प्रकाश साहेबराव पाटील (३९), सिध्दार्थ सुरेश बारे, जगदीश चव्हाण (२६, दोघे रा. सावेर), अभिलाष सुधाकर महाले (वय ३० भौरखेडा), विनोद आबा वानखेडे, मुन्ना वर्जन चव्हाण (वय २३, सावेर), दिनेश वर्जन चव्हाण (वय २५) जखमी झाले. एक जण वाहनाच्या मागच्या सिटवर बसल्याने त्याला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी नागरिकांनी धाव घेत मदतकार्य केले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दिनेश चव्हाण गंभीर जखमी असल्याने धुळे रवाना करण्यात आले.

# पवार साहेब माफी नाही येवल्याची जनता तुमचे आभार मानते, त्यांनी विकास पहिला आहे: भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

कालच्या सभेचे आयोजन ज्यांनी केले. त्या व्यक्तीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विरोधात काम केले म्हणून पक्षाने हाकलवून दिले. पक्षाने त्यांची हकालपट्टी केली होती. त्यांचे पक्षासाठी, येवल्यासाठी, नाशिककरांसाठी योगदान काय? जे दुसऱ्या पक्षाचे लोक सतत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विरोधात भूमिका घेतात. ज्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना त्रास द्यायचा प्रयत्न केला. तीच मंडळी येवला येथे स्टेजवर का? असा सवाल राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थितीत करत ज्या सहकाऱ्यांनी खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी काँग्रेस येवला आणि नाशिक जिल्ह्यात वाढवली ते सगळे सहकारी काल माझ्यासोबत होते असे मत मांडले.

नाशिक येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, जिल्हाध्यक्ष ॲड.रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कार्याध्यक्ष विष्णूपंत म्हैसधुणे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थितीत होते.

ते म्हणाले की, काल झालेल्या स्वागत कार्यक्रमात नाशिककर आमच्या सोबत आहेत हे सिद्ध झाले. त्याबद्दल सर्वांचे आभार. येवला विधानसभेत अतिशय प्रतिकूल परिस्थिती असताना देखील लढलो. येवला मतदारसंघ हा सुरक्षित नव्हता, कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेचे प्रेम यामुळे सर्वदूर हा पक्ष आम्ही पसरविला. या काळात मोठा संघर्ष आम्हाला करावा लागला असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, माझ्या समोर धरणगाव, एरंडोल, वैजापूर, जुन्नर आणि येवला असे पर्याय होते. यामध्ये काम करण्याची संधी ही येवल्यात असल्याचे मी पवार साहेबांना सांगितले. मी स्वतः येवल्याची निवड केली. मी येवल्याची निवड करावी हे पवारांनी सांगितले नाही. हा शिवसेनेचा मतदार संघ होता, मी तिथे संघर्ष केला. येवला मतदारसंघात केलेल्या विकासकामामुळे लोकांनी मला चार वेळेला निवडून दिले. लाखांचे मताधिक्य घेऊन मी निवडून येतो.

काल साहेबांनी माफी मागितली. २० वर्षांपूर्वी चूक केली असल्याचे म्हंटले. साहेबांनी माफी मागितली त्याचे वाईट वाटले. जनता मात्र पवार साहेबांचे आभार मानते कारण त्यांनी विकास पहिला आहे. असे त्यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले की, आपण काल माफी मागितली पण इथले लोक आपले आभार मानत आहेत कारण त्यांनी नाशिक आणि येवल्याचा विकास पाहिला आहे. आपणच मागे एका ठिकाणी म्हणाला होता की, बारामती नंतर सर्वात विकास कोणत्या तालुक्याचा झाला असेल तर तो येवल्याचा झाला आहे, आणि तो भुजबळांनी केला. आता आमच्या सहकार्यांना विकास का दिसत नाही तेच कोडं आम्हाला पडलय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# भाजप व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना युती मान्य आहे का?

### मुख्यमंत्री आज धुळ्यात :राष्ट्रवादीच्या झेंड्याला वगळलं?

धुळे शहरात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी हा कार्यक्रम आज संपन्न होणार असून दोन्ही प्रमुख नेत्यांच्या स्वागतासाठी शहरात जय्यत तयारी करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून शहराच्या विविध भागात शिवसेना आणि भाजपचे झेंडे लावण्यात आले असून मात्र यातून राष्ट्रवादीचा झेंडा वगळण्यात आल्याने नागरिक आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये एकच चर्चा रंगली आहे.

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळावा, तसेच या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने शासन आपल्या दारी हा उपक्रम घेतला जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहेत. विविध ठिकाणी शासन आपल्या दारीचा कार्यक्रम पार पडत असून उद्या धुळे शहरातील सुरत नागपूर महामार्गावर असलेल्या राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक सहाच्या मैदानावर शासन आपल्या दारीचा उपक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या स्वागताची तसेच या कार्यक्रमाची तयारी मोठ्या प्रमाणावर सुरू असून ज्या मार्गावरून या प्रमुख नेत्यांचे आगमन होणार आहे. त्या मार्गावर पक्षाच्या झेंडे लावून हा मार्ग सजविण्यात आला आहे. मात्र विशेष म्हणजे, यात भाजप आणि शिवसेना या दोनच पक्षांचे झेंडे काल रात्री स्थानिक नेत्यांनी लावले असून यातून राष्ट्रवादीचा झेंडा वगळण्यात आल्याचे दिसून आले.

### दादा समर्थकांना संधी...

**सध्या जिल्ह्यातील अजितदादांच्या समर्थकांना नवीन पदाधिकारी निवडीत संधी आहे, तर दुसरीकडे शरद पवार यांच्या गटाकडून नवीन जिल्हाध्यक्ष निवडला जाणार का? याबाबतही पदाधिकाऱ्यांत संभ्रमावस्था आहे.**



### अजित दादाच्या गटाचा कोण?

**राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर आता जिल्ह्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांरी कोण याची देखील नाव आजून समोर आले नाही. कार्यक्रमासाठी येणाऱ्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या स्वागताची तसेच या कार्यक्रमाची तयारी मोठ्या प्रमाणावर सुरू असून ज्या मार्गावरून या प्रमुख नेत्यांचे आगमन होणार आहे. त्या मार्गावर पक्षाच्या झेंडे लावून हा मार्ग सजविण्यात आला आहे. मात्र विशेष म्हणजे राष्ट्रवादीचा झेंडा कोण लावणार, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांरी कोण याची देखील चर्चा शहरात सुरु होती.**



## आलाय पावसाळा; तब्येती सांभाळा


'नेमेचि येतो पावसाळा' या उक्तीप्रमाणे आता पावसाळ्यात उद्भवणाऱ्या रोगराईपासून स्वत:चा बचाव करा, असे म्हणण्याची वेळ आली आहे. गेल्या काही वर्षांत 'हवामान बदल', 'ग्लोबल वार्मिंग' हा विषय सर्वतोमुखी त्याचबरोबर चिंतेचाही बनला आहे. जगभरात सर्वत्र ऋतुमानात फार मोठे बदल होताना दिसत आहेत. त्याच्या परिणामी निसर्ग आपला रंग बदलू लागला असल्याचे अनेक घटनांवरून स्पष्ट होत आहे. काही ठिकाणी समुद्रातील पाण्याची पातळी वाढताना दिसत आहे, तर काही ठिकाणी बर्फाच्या पर्वतरांगांमधील बर्फ वितळू लागल्याने नद्यांना पूर आल्याचे निरीक्षण शास्त्रज्ञांनी नोंदविले आहे आणि संबंधितांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचनाही केल्या आहेत. आपल्या देशाचा विचार केल्यास सर्वसाधारणपणे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन प्रमुख ऋतू आता आपला कालावधी बदलत असल्याचे दिसून येत आहे. उन्हाळा आता अधिक कडक झाल्याचे यंदा जाणवले, तर थंडीच्या मोसमानेही मागचे सर्व विक्रम मोडल्याचे दिसले आणि पावसाळा तर प्रमुख चार महिने संपल्यानंतरही अधूनमधून बरसत जणू वर्षभर सुरू होता. यावेळी तर मान्सून विलंबाने दाखल झाल्यामुळे प्रचंड उकाड्याने सर्वचजण हैराण झाले होते. तर बळीराजा पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत आकाशाकडे डाळे लावून बसला होता. आता राज्यात मान्सून अनेक ठिकाणी पोहोचला असला तरी काही ठिकाणी अद्याप त्याची आतुरतेने वाट पाहिली जात आहे. मुंबई व आसपासच्या परिसरात सध्या तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस, तर काही ठिकाणी सरींचा अनुभव घ्यायला मिळत आहे. या वातावरणाच्या बदलांमुळे सर्वसामान्यांना आरोग्यविषयीच्या अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यातूनच, पावसाळ्यासोबत आता साथीच्या आजारांनीही डोके वर काढले आहे. मुंबईसह संपूर्ण देशभरात गेल्या काही दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. पाऊस म्हणजे जास्त आर्द्रता आणि पाणी साचणे. त्यामुळे तापाबरोबरच आरोग्याच्या अनेक समस्याही उद्भवतात. अशा हवामानात डेंग्यू व्यतिरिक्त चिकनगुनिया, मलेरिया, टायफॉईड, खोकला, सर्दी, ताप, थकवा, सुस्ती, डोकेदुखी यांसारख्या समस्या सामान्यपणे उद्भवत असतात. अनेक ठिकाणी चिखल, जागोजागी रस्त्यामधील खड्ड्यांमध्ये आणि अन्य सखल भागांत साचलेले पाणी अशा अस्वच्छ परिसरात साथीच्या आजारांचा जोर वाढण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत सर्दी, खोकला आणि साधा ताप या आजारांबरोबरच मलेरिया, डेंग्यू अशा जीवघेण्या आजारांचे प्रमाणही वाढले आहे. तर, ही परिस्थिती फक्त मुंबईतच नाही तर राज्यात अन्यत्रही पाहायला मिळत आहे. याचा विचार करून संसर्गजन्य आजारांना सामोरे जाण्यासाठी मुंबईतील पालिका रुग्णालयांसह अन्य रुग्णालयेही सज्ज झाली आहेत. पावसासाठी १ जूनपासून सुरू करण्यात आलेल्या मान्सून ओपीडीत रुग्णसंख्या हळूहळू वाढताना दिसत आहे. नायर, केईएम, सायन, कूपरसह राज्य शासनाच्या जे. जे. रुग्णालयातही मलेरिया आणि व्हयरल फिव्हरचे रुग्ण दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. सध्या मलेरियापेक्षा तापाच्या रुग्णांची संख्या अधिक आहे. पावसाळ्यातील वातावरण हे साथीच्या आजारांच्या जीवाणूंसाठी पोषक असते. याच ऋतूत पाण्याचेही प्रदूषण वाढते. त्या अशुद्ध पाण्यामुळे होणारे आजार बळावतात. तसेच साचलेल्या पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढते. अशुद्ध पाणी आणि डास या आजारांची उत्पत्तीस्थाने आहेत. सध्या काही डेंग्यूचे रुग्ण आढळत आहेत. लहान मुले आणि प्रौढांमध्ये त्याची लागण झाली असून रुग्ण हॉस्पिटल्समध्ये दाखल होत आहेत. डेंग्यूसदृश्य लक्षणांपैकी रुग्णाला ताप नसतानाही घसा दुखणे, श्वास घेण्यास अडचणी निर्माण होणे अशी लक्षणे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत, तर स्वाईन फ्लूचे, टायफॉईड, कावीळच्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. डेंग्यूसारख्या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना त्वरित राबवणे गरजेचे आहे. रुग्णांची वाढती संख्या ध्यानी घेऊन डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरात आवश्यक त्या उपाययोजना करायला हव्यात. खोकला, ताप, पोटदुखी, अंगदुखी यांसारखे आजार अंगावर काढू नका. पावसाळ्याच्या काळात पचनशक्ती क्षीण झालेली असते. या दिवसांत, आहार, खाण्यापिण्याच्या सवयी आणि आपण किती पाणी पितो यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

# दुडिया : तुझ्या जळत्या छत्तीसगडात!

विश्वास पाटील हे मराठी साहित्य विश्वातील एक चिरपरिचित, प्रतिष्ठित, ख्यातनाम नाव आहे. यापूर्वी त्यांच्या पानिपत, महानायक, झाडाझडती व इतर कादंबऱ्या गाजलेल्या आहेत. अलीकडेच शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या 'झंझावात' व 'रणखैंदळ' या कादंबऱ्यांनी विक्रीचा उच्चांक गाठलेला आहे. त्याच घाईगर्दीत नुकतीच त्यांची 'दुडिया: तुझ्या जळत्या छत्तीसगडात! ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. पाटील ह्यांनी या कादंबरीसाठी मात्र एका अतिशय वेगळ्या पार्श्वभूमीचा आणि प्रखर असा विषय निवडला आहे. नुकतेच या पुस्तकाचे हिंदीत व इंग्रजीतही भाषांतर झाले आहे.

विश्वास पाटील यांची कथा सांगण्याची हातोटी आणि त्यामागील संशोधन नेहमीच वाखाणण्याजोगे असते हे वेगळे सांगायला नको. कुठलाही विषय ते अशा पद्धतीने मांडतात की त्यात पुढे काय होणार आहे ह्याविषयी वाचकाला उत्सुकता लागून राहते. कादंबरीतील घटना वा प्रसंग चक्षुर्वैसत्यम वाटण्याइतके आपल्या समोर जसेच्या तसे उभे करतात. हीच तर पाटील यांची खासियत आहे.

नक्षलवादाच्या पार्श्वभूमीवरील या कादंबरीत नक्षलवादाची समस्याच नव्हे तर त्या भागातील वास्तविक परिस्थिती आणि ह्या समस्येमुळे भरडले जाणाऱ्या जनसामान्यांचेही चित्रण आहे. आजवर एकतर नक्षलवादी बंडखोर आहेत किंवा सरकारसाठी ते अडचणीचे कारण आहेत किंवा ते गरीब लोक आहेत, असंच चित्र त्या विभागाच्या बाहेर असलेल्या लोकांच्या समोर आहे. नक्षलवादी संघटना ही 'जल, जमीन आणि जंगल' पळवायला आलेल्या सामर्थवान उद्योगपतींच्या कचाट्यातून सोडवायला आलेले तारणहार आहेत असाही एक समज आहे. परंतु नक्षलवाद्यांमुळे त्या भागातील ठासलेल्या मशीनगन्सच्या पेचात अडकलेल्या जनतेची ही संघर्षमय कहाणी आहे. स्फोटकाने पेटलेली




तिथली अरण्यं, जीव मुठीत धरून राहणारे लोक आणि निधड्या छातीने सामोरे जाणारे पोलीस हे सगळं एका मोठ्या कॅनव्हासवर चित्रित करण्यात आले आहे. त्यात सांभाळला गेलेला समतोल हेच ह्या पुस्तकाचे बलस्थान आहे.

दुडिया या आदिवासी मुलीच्या दृष्टिकोनातून जेव्हा परिस्थिती पाहिली जाते, तेव्हा काही गोष्टी आपोआप समजतात. पुस्तक वाचत असताना प्रत्यक्ष तो परिसर, ती घनदाट जंगले तुडवताना येणारा थरार चक्क अनुभवत असल्याची जाणीव होते. एखाद्या चित्रपटातील काल्पनिक कथेवर आधारलेले चित्रण कॅमेऱ्याच्या डोळ्यांनी पाहणे वेगळे पण छत्तीसगडमधील प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली



व्यंकटेश देवनपल्ली
९५३५०२२११२

आणि कानांनी ऐकलेली खबरबात वाचत राहणे हा एक वेगळा अनुभव आहे. कित्येक वेळा सामान्य माणसासाठी पोलिसांची बंदूक आणि नक्षलवाद्यांची बंदूक या दोन्ही सारख्याच असतात, हे विधान मांडण्यात ही कादंबरी यशस्वी ठरली आहे. त्या तिथल्या लोकांचे जीवन दुधारी तलवारीवर चालत जाण्यासारखे आहे.

'दुडिया' ही कादंबरी नक्षलवादाच्या समस्येवर प्रकाशझोत टाकते. हे समृद्ध राज्य कोणत्याही विद्रोही, बंडखोर लोकांमुळे नव्हे तर उच्च पदांवर बसलेल्या लोकांच्या अहंकारामुळे, माणसाच्या लोभी आणि मानव निर्मित समस्यांमुळे अशा परिस्थितीतून जावे लागत आहे, हे लेखकाने फारच व्यवस्थितपणे मांडले आहे. उदाहरणादाखल, 'ह्या नक्षलींचा प्रभाव इकडे वाढलाच कसा ?' या प्रश्नावर तिथले डीवायएसपी प्रांजळपणे कबुली देताना म्हणतात, 'नक्षलींच्या रोगाचा हा तोहफा आम्हांला दुसऱ्या कोणी दिलेला नाही, पिढ्यांपूर्वी या राज्यात विविध खात्यांत काम करणाऱ्या सरकारी बाबू तेव्हा इथल्या गरीब आदिवासींचे शोषण आणि गैरवर्तणुकीचा जो घातला, त्याचीच फळे आम्ही आज भोगतो आहोत झालं.'

ही कादंबरी केवळ नक्षलवादाच्या समस्येभोवतीच ही कथावस्तु मांडत नाही तर जे वास्तविक समस्येचा सामना करत आहेत अशा लोकांच्या स्थितीबद्दल आणि नक्षलवादाचा त्यांच्या जीवनावर कसा परिणाम होत आहे ह्याचे विदारक चित्रणही आहे. आधी छत्तीसगडमधील नक्षलवादी संघटनेत सामील झालेली आणि नंतर त्या चळवळीतून बाहेर पडलेल्या दुडियाच्या कथनातून त्यांची हालत आपल्यासमोर उभी राहते. ती सांगते, 'एकीकडे पोलीस आणि दुसरीकडे नक्षली ह्या दोघांचा हाग्यामार. मधल्यामधे जर्मलच्या भांड्यासारखी आम्हा आदिवासींची जिंदगी चेपून जात होती. त्याच वेळी माथ्यावर सतत लोंबकळणारं फाटक्या भविष्याचं काळं आभाळ.'

'हळूहळू आमच्या पहाडात एक नवा पेच उभा राहिला. ती गळफासाची दुहेरी गाठ भारी काचू लागली. नक्षली आणि पोलीस ह्या दोघांनी गळ्याभोवती बांधलेल्या नीरगाठीत आम्हा गिरिजनांचा श्वास मात्र कोंडू लागला होता. जिंदगी नको नको होऊ लागली.'

एकेकाळी तारणहार वाटणाऱ्या नक्षलवाद्यांकडून नंतर जेव्हा 'हम करे सो कायदा' हा जुलमी फंडा उपयोगात आणला गेला तेव्हा आजूबाजूच्या गावातील संतप्त गावकरी नक्षलींच्या दहशतीविरूद्ध पेटून उठले. त्या विराट जनाआंदोलनाचे नाव 'सलवा जुडूम' असे केले गेले. गोंड भाषेत या शब्दाचा अर्थ 'शांती मोर्चा' असा होतो. हा सबंध भाग मुळातून वाचण्यासारखा आहे.

नैसर्गिक संपत्तीने संपन्न असलेले हे राज्य मानवनिर्मित गंभीर समस्येला कसे तोंड देत आहे हे दाखवण्यात आले आहे. छत्तीसगडच्या बारीक सारीक गोष्टींही लेखकाच्या नजरेतून सुटलेल्या नाहीत, ज्यामध्ये आदिवासी जीवनाचे अस्सल वर्णन आणि नैसर्गिक संपत्तीच्या लुटीचे वास्तविक वर्णनही टिपलेले आहे. त्या भागातील जंगले, आबुझमाड पहाड, गातापारा, देरा टोला आणि बारह पत्ती ही तिथली गावंदेखील इतर पात्रांप्रमाणे त्यातील महत्त्वाचा भाग आहेत.

लेखक स्वत: एक कथाकार आणि चित्रपट निर्माते आहेत. त्यामुळे कादंबरीची भाषा आणि त्यातील विलक्षण थरार ह्यामुळे कथा अतिशय वेगवान पद्धतीने कथा पुढे सरकत जाते. पुढे काय होईल ही उत्सुकता सतत राहते हे या कादंबरीचे खरे यश आहे. लेखकाच्या निवेदन शैलीमुळे ही कादंबरी वाचनीय झाली आहे.

## घड्याळाचे काटे उलटे फिरतात!

महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शिवसेना-भाजपचे सरकार स्थापन झाले त्याला एक वर्ष पूर्ण झाले. महाविकास आघाडी सरकारला अडीच वर्षे पूर्ण झाल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यांच्या पक्षातून आणि मित्रपक्षाच्या ४० आमदारांनी शिवसेना सोडली आणि भाजपला पाठिंबा देत शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात आले. या एका वर्षात शिंदे-फडणवीस सरकारने अतिशय चांगले लोकाभिमुख निर्णय घेतले. वर्षभरानंतर येणाऱ्या निवडणुकांमुळे असेल; परंतु काही निर्णयांमुळे सर्वसामान्य जनतेला लाभ मिळू शकला. यामुळे सर्वकाही ठीक चाललंय. न्यायाचे निर्णय, विधानसभा अध्यक्षांचे निर्णय हे सर्व रुटीनप्रमाणे होतं. राहणाऱ्या गोष्टी आहेत. मात्र, आता सर्व काही ठीक आहे. असं वाटत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनीच थेट सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. रविवार असल्याने अनेकांचा सुट्टीचा, आरामाचा दिवस. यामुळे शेतकरी वगळता संपूर्ण महाराष्ट्र संडे मूडमध्ये होता. मीडियामधल्या विश्वसनीय सूत्रानाही कोणतीही खबर लागू न देता राजभवनावर राष्ट्रवादीचे नेते अजितदादा पवार यांच्यासह नऊजणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली आणि अखंड महाराष्ट्र राजकारणात काहीही घडू शकते. या एकाच वाक्याच्या चर्चेचे गुऱ्हाळ करत बसला.

कोकणात तर राजकीय गजाली चहा-भजी खाताना अशा काही रंगतात की, क्षणभर असं वाटावं या देशाचे पंतप्रधान काय




करणार, काय बोलणार हे इथल्या लोकांना अगोदरच माहीत असतं. असा समज करूनच तशा 'गजाली' केल्या जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली की राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या सहमतीनेच हे सर्व घडलंय यावरही खूप मोठी चर्चा महाराष्ट्रात होत आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांचे राजकारण आणि राजकीय इतिहास समोर आणला तर त्यांच्यासंबंधी जनतेमध्ये विश्वासापेक्षा अविश्वास अधिक असल्याचे दिसून येईल. 'पवारसाहेब, काहीही करू शकतात' या एका वाक्यातच सर्व काही आलेलं आहे. माजी मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात बंडखोरी करून शरद पवार बाहेर पडले. पुलोदची स्थापना केली. त्या राजकीय उलथापालथीला 'विश्वासघाता'चीच किनार होती. नंतरच्या काळात शरद पवार यांनी तो विश्वासघात नव्हता, तर ती राजकीय अपरिहार्यता होती असं सांगण्याचा प्रयत्न पवारप्रेमी ज्येष्ठांनी सांगण्याचा जरूर प्रयत्न केला; परंतु ती घटना जनता जशी विसरली नाही तशी शरद पवार यांनाही ती जखम घेऊनच राजकीय प्रवास करावा लागत आहे. आजही पुलोदचे मुख्यमंत्रीपद त्यांना टोचणी लावत आहे. फोडा-फोडीच्या राजकारणाला बेरजेचे राजकारण हा शब्दप्रयोगही राजकारणामध्ये शरद पवार यांनीच आणला. गेल्या काही वर्षांत फोडाफोडी म्हणजेच राजकारण असा रूढार्थाने शब्द वापरला जाऊ लागला. काँग्रेस सोडून राष्ट्रवादीची निर्मिती हा देखील याच कुटनितीचाच तो भाग होता. फक्त प्रत्येकवेळी थोड्या वेगळ्या पद्धतीने ही कुटनिती वापरली गेली.

महिन्याभरापूर्वीच शरद पवार यांनी राजकारणातून थांबण्याचा निर्णय जाहीर केला आणि दोन दिवसांत कार्यकर्त्यांच्या अति आग्रहामुळे पुन्हा सक्रिय होत असल्याचे जाहीर केले. त्या आठवड्याभरातील राष्ट्रवादीच्या सभा, बैठका, पत्रकार परिषदा यातून नक्कीच काहीतरी घडतंय याची चर्चा महाराष्ट्रभर होत होती. त्यातच अपेक्षेप्रमाणे राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल आणि खा. सुप्रिया सुळे यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. राष्ट्रवादीचे नेते अजितदादांना पक्षीयस्तरावर कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नसल्याने साहजिक त्यांनी नाराजी पक्षाच्या एका मेळाव्यात जाहीरपणे बोलून दाखवली होती. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ही खरी की खोटी फूट यातली सत्यतेवर आजही लोक विश्वास ठेवायला तयार नाहीत. शरद पवार यांनी अतिशय नियोजन पद्धतीने शिवसेना संपवली, हे ज्यांना राजकारण कळतंय तो नाकारूच शकणार नाही. काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आकोलकर यांनी 'लबाडा घरचं आवतण' या शीर्षकाखाली पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेला लेख माझ्या वाचनात आला होता. त्या लेखामध्ये शरद पवार त्यांच्या मनातलं त्यांच्या पत्नी प्रतिभाताई पवार यांना तरी काही सांगत असतील का? अशी शंकाच व्यक्त केली होती. इतका कोणालाही कोणत्याही गोष्टीचा थांगपत्ता लागू न देता राजकारण करण्याची शरद पवार यांची 'स्टाईल' फारच अलग आहे. माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचा पराभव लातूरमध्ये करण्यासाठी शिवाराव पाटील यांना निवडणुकीत जनता दलातर्फे उभे करून स्व. साथी किशोर पवार यांना सोबत घेत व त्यांनी स्व. विलासराव देशमुख यांचा पराभव घडून आला. अर्थात आता पाणी बरंच वाहून गेलंय. सारे राजकीय संदर्भ बदलले आहेत. दस्तुरखुद्द बारामतीत जुणे-जाणते शरद पवार यांच्यासोबत आहेत, तर नवीन तरुण पिढी मात्र अजितदादा पवार यांच्याशी जोडलेली आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात ज्या खेळाची मांडणी शरद पवार यांनी काही वर्षे केली. आजच्या राजकारणात हा पुढचा अध्याय आहे इतकेच. सध्या तर राजकारणाविषयी मोठ्या प्रमाणावर मतमतांतरे मांडली जात आहेत. नैतिकता, विश्वासार्हता, अविश्वास, फोडा-फोडी, फसवणूक या सर्वांची बांधलेली मोट म्हणजे राजकारण असा समज समाजमनामध्ये रूढ होत चालला आहे. खरं तर महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या गोवा राज्याच्या राजकारणात नेहमीच अस्थिरता असायची. स्व. मनोहर पर्रिकर यांनी ही अस्थिरता संपवली आणि विद्यमान गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी तर गोव्यात विरोधक कोण हे शोधावे लागतील अशी स्थिती निर्माण केली. राजकारण काहीही आणि कसंही असलं तरीही भविष्यात निवडणुका होतील; परंतु निवडून आल्यानंतर सत्तास्थापनेत निवडून आलेले सर्वच सहभागी झाले तर आश्चर्य वाटायला नको. शेवटी सर्वांनाच 'विकास' करायचा आहे. मग विकासाच्या मुद्द्यावर एकत्र तर यावचं लागेल ना जनता सब जाणती है !

**- माझे कोकण : संतोष वायंगणकर**

## शब्दकोडे-११६



आडवे शब्द

१. दृष्टी ३. तात्काळ उत्तर देणारा ८. टाळ्यांचा आवाज ११. भ्रमर, भुंगा १२. नेत्रकटाक्ष १३. दशानन १४. नातेवाईक १५. पार्थिव १७. झुणक्याबरोबरची रोटी १८. बळेच काढलेला मुहूर्त १९. जाडसर पीठ २१. विनाश करणारी २२. नम्र, वाकलेला २४. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था २६. पाच दिवसाचा क्रिकेट सामना ३०. फळातील द्रव ३२. आप्त नसलेला ३३. खोटेपणा ३४. सम्राट ३५. खूप, पुष्कळ ३७. वर्षभर ३९. लाकूड कापण्याचे हत्यार ४१. रत्नमाला, रत्नांची माळ ४३. कापूस ४६. उभाच्या उभा! ४७. उत्कृष्ट बल्लवाचार्य म्हणून प्रसिद्ध असलेला दमयंतीचा पती ५०. अयोध्येचा राजा ५२. उत्तराधिकारी ५४. चंद्र ५५. थंडगार ५७. मातीचा सूक्ष्म कण ५८. कोळिष्टकावरील धागे ६०. श्वासरोग ६१. चणचण, दुर्भिक्ष्य ६२. परमेश्वर ६३. चट्टामट्टा ६५. फूल ६७. पवित्र ६९. सर्वत्र सांगत सुटणे ७१. निपचित ७३. फोडातील द्रव ७४. बलुतोदारी व्यवस्थेतील गावप्रमुख ७६. जन्म ७७. खोल खाई ७८. दरोडा ७९. बाळाच्या हातातील मणिबंध

उभे शब्द

१. देवीचा उत्सव २. श्रीविष्णूचे एक नाव ३. उगीच ४. अटीची भाषा ५. लोकसंख्येची मोजणी ६. क्रिकेटमधील अवांतर धाव (इंग्रजी) ७. पुंगी ८. नारायण राणे यांचे गाव ९. कंबरेवर १०. हजरा किलो १६. पाठविलेला १७. लुच्ची १८. राघोबांचे नारायणरावांशी नाते २०. वेडावाकडा २१अ. थंडीची लाट २३. मऊ २५. शिकार २७. सर्प २८. एक सुगंधी वनस्पती २९. कुरापत ३१. मदतनीस ३३. आघात ३६. बाण ३६अ. मुस्लीम ३८. लोणच्यातील रस ४०. समशेर ४२. अधाशी, लालची ४४. हातातून निसटणारे खनिज ४५. सर्वांना सारखे ४६. नावाडी ४८. तर्क ४९. मनीची इच्छा ५१. संगोपन, लाडकोड पुरवणे ५२अ. ऊभदार पांघरुण ५३. गोंधळ ५६. पोळी भाजण्याचे साधन ५९. माजलेला, गर्वीष्ठ ६०. धम कावणी ६१अ. संधी, मोका ६४. रांग ६६. हृदय ६८. रोख ६९. पांढुरका रंग ७०. हिंदीत शपथ ७२. तऱ्हा, प्रकार ७४. फलक ७५. नेम, उद्दिष्ट

### शब्दकोडे ११५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.सकाळ दुपार संध्याकाळ ८.मधुर १०.नत ११.रातवा १२.गलेलठ्ठ १४.दणका १६.दरवळणे १८.साचा १९.समर २१.सण २२.शनिवार २५.रमराट २७.सरोद ३०.कालवड ३२.अंतराळवीर ३४.सरस ३६.ताल ३७.गजर ३८.कर ३९.कुंतल ४१.नजर ४३.मालवणे ४४.सावज ४६.मातापिता ४७.रमावर ४८.हकनाक ५१.समोर ५२.मंजरपाट ५३.मलमल ५५.माग ५७.आजार ५८.सकटनिकट ६०.गो ६१.वजन ६३.टच ६४.बकासूर ६६.सागर ६७.अंबाबाई ६९.कचरा ७१.रवा ७३.श्वसन ७५.मकरंद ७६.पाकळी ७७.आरसा ७८.धनगर

**उभे उत्तर**

१.सनदशीर २.कातण ३.पारावार ४.रत ५.संवाद ६.कालवण ७.ओले ८.मठ्ठ ९.रजाचा गज करणे १२.गणेश १३.लकवा १५.कासरा १७.रसद २०.मटका २३.निव्वळ २४.रबर २६.मगर २७.सवलत २८.रोड २९.खातरजमा ३१.लताकुंज ३२.अंजन ३३.वीरमाता ३४.सरकारजमा ३५.सरसावणे ३८.कवडीमोल ४०.लवकर ४२.रताळे ४५.वर ४८.हजरजबाबी ४९.नापास ५०.कटकट ५१.सम ५२.मांजा ५३.मकबरा ५४.लटका ५६.गवगवा ५७.आन ५९.टचकन ६२.जर ६५.सुधाकर ६६.सारथी ६८.ईश्वर ७०.पदर ७२.भोक ७४.ससा ७५.मग

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नाशिक महानगर परिवहन महामंडळचा वर्धापनदिन विविध उपक्रमांनी साजरा







**नाशिक । प्रतिनिधी**

दि. ८ जुलै २०२१ रोजी स्थापन करण्यात आलेल्या नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकचा द्वितीय वर्धापन दिन शनिवार दि. ८ जुलै रोजी साजरा करण्यात आला. शनिवारी सिटीलिंक वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रवाशांचा सिटीलिंकला मिळणारा उदंड प्रतिसाद लक्षात घेता प्रवासी, चालक, वाहक हे सिटीलिंकचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे प्रवासी, चालक,



वाहक यांना पुष्प तसेच पेढे वाटप करण्यात येऊन त्यांना देखील या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. निमाणी बस स्थानक तसेच नाशिकरोड बसस्थानक याठिकाणी हा पेढे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. निमाणी बसस्थानक याठिकाणी वाहतूक नियंत्रक आर.बी.आहेर, एस.एम. चव्हाणके, सी.व्ही.आव्हाड, मार्ग तपासणीस पर्यवेक्षक नाना सानप यांच्या हस्ते पुष्प व पेढे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर नाशिकरोड बसस्थानक याठिकाणी वाहतूक व्यवस्थापक अजित बच्छाव, आर.बी.जैन, ए.ए.आव्हाड, एस.एल.पवार यांच्या हस्ते पेढे वाटप करण्यात आले.

तसेच सिटीलिंक मुख्यालयात पास काढण्यासाठी आलेल्या प्रवाशांना पेढे वाटप करण्यात आले. यावेळी प्रवाशांनी सिटीलिंक द्वितीय वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या.

तसेच तपोवन डेपोत श्रीफळ चढवून बसेसची पुजा करण्यात आली. यावेळी पोलिस निरीक्षक गणेश न्याहाळदे, वाहतूक महाव्यस्थापक मिलिंद बंड, व्यवस्थापक रणजित ढाकणे यांचा सत्कार करण्यात येऊन सिटीलिंकच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी व्यवस्थापक रणजित ढाकणे, राजीव शिंदे, महेश भागवत, योगेश बर्वे, अनिल साळुंके, अमोल पाटील आदी उपस्थित होते.

प्रवाशांना अधिकाधिक प्रवासीभिमुख सेवा देताना यापुढे देखील उत्तमोत्तम सेवा देण्यासाठी सिटीलिंक नेहमीच प्रयत्नशील राहील असे आश्वासन यानिमित्ताने देण्यात आले.



# शिक्षकेतर लोकशाही आघाडीतर्फे वेतन पथक नुतन अधिक्षकांचा सत्कार

## शालार्थच्या कामांसाठी वेतन पथक सदैव तत्पर– पाटील

**जुने नाशिक । प्रतिनिधी**

जिल्हा माध्यमिक वेतन पथक कार्यालयाचे नुतन अधीक्षक तथा अतिशय हुशार, तंत्रस्नेही व जिल्हा प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले नितीन पाटील यांचा जिल्हा शिक्षकेतर लोकशाही आघाडीतर्फे स्वागत करून सत्कार करण्यात आला. शालार्थची अटॅच डीटॅच, चेंज डिटेल्स ही ऑनलाईन वेतन देयकाशी संबंधित कामांसाठी हे कार्यालय सदैव तत्पर व कटीबद्ध असून, कार्यालयाकडून कुठलेही ऑनलाईन प्रस्ताव तथा कामे प्रलंबित राहणार नाही, असे आश्वासन अधीक्षक पाटील यांनी यावेळी दिले.

दरम्यान जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शाळेशी संबंधित ऑनलाईन कामे समक्ष कार्यालयात येऊन विहीत वेळेत करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ धात्रक, टीचर्स सोसायटीचे माजी अध्यक्ष संजय देवरे, दत्तात्रय कातकाडे, शशी पाटील, लियाकत पठाण, बाळासाहेब देशमुख, विश्वनाथ ठोक, अविनाश रहाणे, शांताराम देवरे, भाऊसाहेब बोराडे, अरुण मानकर, महेश बच्छाव, तौफिक खान, इसरार शेख, तौफीक अन्सारी, सूर्यवंशी, पाटील, ब्राम्हणकर, जयश्री जोगदंड, ढोकणे व पाटील आदी शिक्षकेतर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच वेतन पथक कार्यालयातील मुख्य लिपिक चौधरी, मणियार, शेखर पाटील, विजय सांगळे, प्रमोद शिंदे, लोळगे, देशपांडे व आदी उपस्थित होते.

# 'नाका तिथे शाखा' ही संकल्पना संपूर्ण पाथर्डी पंचक्रोशीत राबवणार– धाकराव

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

पाथर्डीफाटा येथे मनसेची 'नाका तिथे शाखा' ही संकल्पना संपूर्ण पाथर्डी पंचक्रोशीत राबविण्यात येईल असे आश्वासन मनसेचे वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष निकितेश धाकराव यांनी दिले. मनसेच्या वतीने राज ठाकरेंची मूळ संकल्पना 'नाका तिथे शाखा' ही संकल्पना संपूर्ण पाथर्डी फाटा परिसरात राबविण्यासाठी मनसेचे वाहतूक सेना जिल्हा जिल्हाध्यक्ष धाकराव यांच्या जनसंपर्क कार्यालयात मनसे प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

पाथर्डी फाटा येथील बैठकीत येत्या काही दिवसात धाकराव यांच्या मार्गदर्शनानुसार



पाथर्डी गाव पंचक्रोशीत 'नाका तेथे शाखा' चे उदघाटन करण्यात येणार आहे. याप्रसंगी योगेश बच्छाव, प्रशांत रहाणे, अक्षय कोंबडे, रोहित वाघचौरे, प्रकाश बोंबलवाड, निवृत्ती वाघ, वैभव डगळे, क्षितिज गोराडे, सागर शेलार, गणेश गुरकुले, सौरभ घोरपडे, दादाजी ह्यालिज, गोपाळ हरकल, संदीप जगझाप, संजय देवरे, संदीप दोंदे, अर्जुन वेताळ, देवचंद केदारे, कैलास मोरे आदिसह मनसे सैनिक उपस्थित होते.

# निधन वार्ता

## गणेश घोलप



**नाशिक ।** पिपंळद येथिल रहिवाशी गणेश संपत घोलप (वय३९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, बहीण असा परिवार आहे.

## जनाबाई खोडे



**इंदिरानगर ।** वडाळागाव येथील रहिवासी जनाबाई पुंजा खोडे (वय५८) यांचे निधन झाले. त्याच्या पश्चात पती, दीर, दोन मुले, सुना, दोन मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे. त्या पुंजा महादू याच्या पत्नी होत.

# युवकांचा स्वयंस्फूर्तीने भाजपमध्ये प्रवेश

**नाशिक । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जगात उंचावलेली भारताची प्रतिमा आणि महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा झंझावात या सर्व विषयांना प्रेरित होऊन काल सातपूर येथील विविध मंडळ व युवकांनी भाजप नाशिक शहर अध्यक्ष गिरीश पालवे यांच्या अध्यक्षतेत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

प्रवेश करणारी सामाजिक मंडळ वक्रतुंड युवा प्रतिष्ठान श्रमिकनगर, हिंदुत्व युवा फाउंडेशन बळवंतनगर, शिवरुद्र



ग्रुप सोमेश्वर कॉलनी, राजदूत सामाजिक मंडळ, नाशिक तसेच सागर वैष्णव, जगदीश गांगुर्डे, मुन्ना यादव, सोनू शेख अश्या बऱ्याच युवकांनी प्रवेश केला.भाजप अध्यक्ष गिरीश पालवे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. प्रवेशकर्त्यांना ८९८०८०८०८० या क्रमांकावर मिसकॉल करून प्राथमिक सदस्य करून घेण्यात आले. यावेळी भाजप शहर सरचिटणीस जगन पाटील, उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी नगरसेविका इंदुबाई नागरे, शहर सचिव संतोष नेरे, हर्षा फिरोदिया, क्रीडा आघाडी संयोजक राकेश पाटील, सातपूर सरचिटणीस चारुदत्त आहेर, वसंत उशीर, राहुल बोरादे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सरस्वती विद्यामंदिर शाळेत पालक मेळाव्याचे आयोजन

**लासलगाव । वार्ताहर**

येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पालक -शिक्षक व संचालक यांच्यात संवाद साधण्यासाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.या पालक मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून लासलगाव वनस्थळीच्या संचालिका अनिता गंधे तसेच कला, वाणिज्य,विज्ञान महाविद्यालयाचे प्रा किशोर अंकुळणेकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान लासलगाव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश होळकर यांनी स्वीकारले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक भीमराव शिंदे यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा आढावा तसेच शैक्षणिक



व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाचे अतिथी अनिता गंधे यांनी 'बालकांचे संगोपन' या विषयावर बोलताना उत्कृष्ट व जागृत पालक कसा असावा, पाल्याला सक्षम करण्यासाठी संस्काराची व विचारांची जडणघडण कशाप्रकारे करावी, पाल्याचे छंद कसे जोपासावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तर किशोर अंकुळेकर यांनी विद्यार्थ्यांचे 'मानसिक स्वास्थ्य' या विषयावर बोलतांना विद्यार्थ्यांचा भावनिक व सांस्कृतिक विकास हा त्याच्या आदर्श व्यक्तिमत्व विकासासाठी कसा महत्वपूर्ण आहे,वाचनसंस्कृतीची जोपासना कशाप्रकारे करावी याबाबत उपस्थित पालकांना उद्बोधन केले.

याप्रसंगी पालक विक्रम देशमुख,प्रिया नागरे, तुषार देवरे, दिनेश बागुल, जयश्री चांदे, अरुण आव्हाड, सोनाली देशमुख यांनी आपल्या पाल्याची प्रगती व येणाऱ्या अडचणी याबाबत आपले मनोगत व्यक्त केलं.यानंतर लासलगाव विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश होळकर यांनी पालकांना येणाऱ्या समस्यांचा मागोवा घेत त्या पूर्ण करण्याचे आश्वासन देत पाल्याच्या प्रगतीत पालक व शाळा यांची भूमिका, आधुनिक तंत्रज्ञान,शून्य कचरा व्यवस्थापन याविषयी पालकांना मनोगत केले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष सुलेमान मुलाणी,संचालक बाळासाहेब बोरसे, डॉ.विकास चांदर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील आव्हाड यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आवड, निवड, सवड यांची योग्य सांगड घातली तरच यशस्वी होता येईल - सावजी

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

ज्या क्षेत्रात भविष्य घडवायचे आहे तिथे विद्यार्थ्यांनी आवड, निवड, सवड यांची योग्य सांगड घातली तर तो यशस्वी होणार आहे. असे प्रतिपादन भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी केले. स्प्लेंडर हॉल येथे भाजप प्रणित युनिक ग्रुपच्या वतीने इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळाप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सावजी बोलत होते.

त्यांनी सांगितले, केवळ पुस्तकी किडे बनू नका, निरीक्षण क्षमता वाढवा, लोक काय म्हणतील? यापेक्षा कोणते काम केल्याने आत्मिक समाधान मिळेल याचा सखोल विचार करा. स्वतःच स्वतःला प्रेरित करत राहा, प्रयत्न करत राहणाऱ्यांना कधीही अपयश मिळत





नाही असेही त्यांनी सांगितले.

यावेळी ओवी चांदवडकर, सत्यम पवार, नेहा जाधव, करण उपासनी, श्रावणी खैरे, प्रथमेश वाघ, संस्कृती जयस्वाल, हर्षिता महाजन, सिद्धी कोकाटे, ओमक सिंग परदेशी, आर्यन जोशी यांच्यासह दोनशे विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर आ. सीमा हिरे, माजी नगरसेवक अँड. श्याम बडोदे, प्रा.अविनाश बल्लाळ, अशोक पाटील, सीमा महाबळ, विजय भावे उपस्थित होते. प्रास्ताविक, स्वागत कार्यक्रमाचे आयोजक युनिक ग्रुपचे संस्थापक माजी सभागृह नेता सतीश सोनवणे यांनी केले.

# मानवस्पर्श सेवाभावी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**लासलगाव । प्रतिनिधी**

लासलगाव येथील मानवस्पर्श सेवाभावी संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,खानगाव नजिक शाळेतील ४२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.संस्थेने २०१६ पासून विविध सामाजिक उपक्रम राबविले असून शाहिद जवान कुटुंब,समाजातील गरीब, दिव्यांग,गरजू व्यक्ती,दिपावली फराळ वाटप,शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्य यांना मदत करण्यात आली.आजपर्यंत संस्थेच्या वतीने १७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रा.सुनिल देवढे यांनी केले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नितीन गारे (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती) यांनी भूषविले .प्रा.अरुण देवढे यांनी शाळेतील विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाविषयी बहूमोल मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष केशवराव जाधव, उपाध्यक्ष योगेश न्याहरकर, सचिव प्रा.सुनिल देवढे सर, खजिनदार सूर्यकांत जाधव विश्वस्त प्रा.अरुण देवढे तसेच, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विजय बकुरे, माजी अध्यक्ष गणेश गारे, सदस्य मयूर निकम, बापू गारे, यशवंत वाघ, ज्ञानेश्वर गारे, बाळासाहेब गारे, सतिष गारे उपस्थित होते.

या उपक्रमासाठी अनंत सोमवंशी(अमेरिका), ज्ञानेश्वर शिंदे(पुणे), कार्याध्यक्ष ऍड.सुनिल वाघचौरे, विश्वस्त समीर देवढे, डॉ.शशिकांत देवढे, सोपान जाधव, ज्ञानेश्वर देवढे, सुरेखा देवढे, सभासद गोरख देवढे, प्रताप आढाव, सचिन शेलार, नवनाथ कोकणे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद राठोड यांनी तर आभार शाळेच्या शिक्षिका आशा गवळी यांनी मानले.कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजपर्यंत संस्थेच्या वतीने १७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय जी-पॅट परीक्षेत ३२ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील एच. आर. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी फार्मसी क्षेत्रात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या राष्ट्रीय जी-पॅट २०२३ या आव्हानात्मक परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करत ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच विद्यार्थ्यांसाठी तज्ञ मार्गदर्शकांचे व्याखानांचे नियमित आयोजन केले होते. महाविद्यालयातील श्रेयस फुलारी (एनटीए स्कोअर ९९.८५), प्रतिक पाटील (९९.२२), देवेश चौधरी (९८.५९), रोहित साळुंखे (९८.५०), रितिका माळी (९८.४४), रुचिका देशमुख (९८.२२), मोहिनी तायडे (९८.०६), साक्षी चौधरी (९७.४२), उज्ज्वला पाटील (९७.००), क्षितीज बारी (९६.९९), वृषाली नेरे (९६.८७), चेतन पाटील (९६.३२), निकिता परदेशी (९६.१८), दिपाली पाटील (९५.९३), प्रांजली महाजन (९५.८७), प्रसाद दौंड (९५.८२), मयुरी पटेल (९५.१४), निकिता भदाणे (९५.०८), हर्षल सपकाळे (९८.०८), प्रफुल्ल बोरसे (९४.३१), जीनेश साम्दाडीया (९३.८१), विशाल पाटील (९३.१७), राजेश्वरी साळुंखे (९२.८१), हितेश बोराडे (९२.७९), मानसी ठाकरे (९२.३१), किमया पवार (९१.८३), विद्या बारी (९१.२९), योगराज पाटील (९०.९८), रुपेश पवार (९०.९८), अमोल पाटील (९०.७९), आदित्य पाटील (९०.३८), राहुल अहिरे (८९.८०) हे विद्यार्थी जी-पॅट परीक्षा उत्तीर्ण झाले.

## न्यूज कॉलम

### लाभार्थ्यांना कार्यक्रमस्थळी येण्यासाठी २७१ बसेसची व्यवस्था

**धुळे ।** धुळे येथील एसआरपीएफ मैदानावर होणाऱ्या शासन आपल्या दारी जिल्हास्तरीय कार्यक्रमास येणाऱ्या लाभार्थ्यांना कार्यक्रमास उपस्थित राहता यावे, याकरीता जिल्हा प्रशासनातर्फे गाव व तालुका पातळीवरुन वाहतुक व्यवस्था करण्यात आली आहे. लाभार्थ्यांची ने-आण करण्यासाठी एसटी महामंडळाच्या २७१ बसेस उपलब्ध करुन दिल्या आहे. त्यात साक्री तालुक्यासाठी ६४, शिरपूर ६६, धुळे ग्रामीण ६८, शिंदखेडा ४४ तसेच धुळे मनपा २९ अशी एकूण २७१ ची बसेसची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. तरी धुळे येथील आयोजित मुख्य कार्यक्रमास जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही श्री. शर्मा यांनी केले आहे.

# येवलेकरांची माफी मागायचं कारण नाही, कामे केली म्हणून वीस वर्ष आमदार : छगन भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

शरद पवार यांनी येवल्याला पाठवलं नाही, तर मी येवला मतदारसंघ मागून घेतला. तिथल्या लोकांनी प्रेम दिल, म्हणून निवडून आलो. आज वीस वर्षांपासून येवल्यात आमदार म्हणून काम पाहतोय. परत परत निवडून येत असलं म्हणजे जनतेचं प्रेम असेल ना? त्यामुळे चुकीचा उमेदवार दिला, असं होत नाही. काम केलं असेल, म्हणूनच माणूस निवडून येतो ना, असा सवाल करत येवल्याची माफी मागायचं कारण नाही, तुमचं नाव खराब होईल, असेही मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना येवल्याच्या सभेनंतर प्रत्युत्तर दिले आहे.



शरद पवार यांनी काल छगन भुजबळ यांचा मतदारसंघ असलेल्या येवल्यात जाहीर सभा घेतली. यात सुरुवातीलाच शरद पवार यांनी येवलेकरांची माफी मागत माझा अंदाज चुकल्याचे ते बोलले. यावर आज छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. ते म्हणाले शरद पवार यांनी मला येवल्याला नाही पाठवलं, मी येवल्याला गेलो. २००४ नंतर स्वतःहून येवला मतदारसंघ मागितला. जनतेच्या प्रेमामुळे निवडून आलो. गेल्या वीस वर्षांपासून निवडणूक लढवून जनतेची साथ मिळत आहे. मग चुकीचा उमेदवार दिला कसा? असा प्रश्न कसा उपस्थित होतो, असा पुनः प्रश्न भुजबळांनी उपस्थित केला. येवला मतदारसंघात कामे केली म्हणूनच जनतेचे प्रेम मिळत आहे, इथली जनता परत परत तोच उमेदवार कसा निवडून देईल? असा प्रतिप्रश्न भुजबळ यांनी पवारांना केला.

ते पुढे म्हणाले की, शिवसेना तिकिटावर २ वेळा आमदार झालो. शिवसेनेत मोठे स्थान होते. मात्र तत्पूर्वी गृहमंत्री असताना तेलगीचा घोटाळ्याचा आरोप करण्यात आला. त्यावेळी राजीनामा देण्यास सांगण्यात आले. त्यावेळी चौकशी झली, त्यात भुजबळ नाव कुठेच नव्हते. नंतर पुन्हा पवारांनी २००४ मध्ये निवडणुकीला उभे राहावे लागेल, असे सांगितले. मला अनेक ठिकाणी निवडणूक लढविण्याची मागणी केली. पवार यांनी प्रेमापोटी रिस्क नको म्हणून सांगितले. पुणे येथील जुन्नर येथून लढण्याचा विचार होता. मात्र त्यावेळी येवल्यातील लोक येत होते. त्यांनी सांगितले आमचा तालुका मागासलेला आहे, तिथे विकास करावा. जुन्नरचा विकास झाला आहे, येवला मतदारसंघातून निवडणूक लढतो, असे मी पवार यांना सांगितले. त्यानुसार मी येवल्यातून लढण्यास सुरवात केल्याचे भुजबळ म्हणाले.

### नाशिकची जनता माझ्यासोबत

**छगन भुजबळ पुढे म्हणाले की, कालच्या सभेच नियोजन ज्या माणिकराव शिंदे यांनी केले होते. त्यांना २ जानेवारी २० ला पक्षातून बाहेर केले. शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली होती. त्यांचे पक्षासाठी योगदान नाही, येवल्यासाठी तरी काय योगदान आहे, हे मला माहिती नाही. शिस्तभंगाची कारवाई झालेल्याकडून सभेची तयारी करण्यात आली होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात भूमिका घेणारे दराडे बंधू स्टेजवर होते. जे वृद्ध आहेत, ज्यांचे काम संपले होते ते सभेला आले होते, तिथले तरुण मंडळी माझ्या स्वागतासाठी आले होते, त्याचबरोबर नाशिकची जनता माझ्यासोबत असल्याचा विश्वास भुजबळांनी व्यक्त केला.**

# धानोरा येथे विना परवाना शेकडो क्विंटल धान्यसाठा जप्त

### तहसीलदार पुलकित सिंह पुन्हा अँक्शन मोडमध्ये

**नंदुरबार । प्रतिनिधी**

तालुक्यातील धानोरा येथे गेल्या दोन दिवसात तहसीलदार पुलकित सिंह यांनी कारवाई करून विना परवाना साठा करून ठेवलेला धान्य साठा जप्त केला असून दुकाने सिल केली आहेत.

दि.७ जुलै रोजी सकाळी १० वाजता धानोरा बस स्टॉपचजवळील शिव शंकर निवासच्या तळमजल्यावर चंद्रकांत पुंजाराम चौधरी यांच्या घरात ३२८ क्विंटल गहु व त्यांच्या नांवे असलेल्या दुकानात ९ क्विंटल ३० किलो गहू व तांदुळ ५ क्विंटल ६६ किलो तांदुळ अवैधरित्या कोणताही परवाना न घेता साठवणुक करुन ठेवल्याचे आढळुन आले. म्हणून चंद्रकांत पुंजाराम चौधरी व हिरामण पुंजाराम चौधरी (रा. धानोरा ता. नंदुरबार) यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अन्वये कारवाई करण्यांत आली आहे. तसेच त्यांच्या शिवसागर ट्रेडींग धान्य खरेदी विक्री केंद्र डीडीसी बँकच्या समोर असलेल्या शॉपींग सेंटरच्या ३ गाळयामध्ये ५८३ क्विंटल सोयाबीन साठादेखील आढळुन आला आहे. तोदेखील सिल करण्यात आला आहे. परवानाधारकाचा लेखी खुलासा घेवुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यांत येणार आहे. धानोरा येथील जि. प. शाळेजवळील मदनलाल बनवारीलाल अग्रवाल यांच्या मालकीच्या गोदामाची तपासणी केली असता त्याठिकाणी गहु ४५ क्विंटल, बाजरी ६ क्विटल व ऐरंडी ४० क्विटल व कापुस ५० क्विंटल आढळून आले आहे. याबाबत मदनलाल अग्रवाल यांचादेखील लेखी खुलासा घेण्याची कारवाई सुरु आहे. तसेच मुख्य बाजारातील ताराकाशेठ यांच्या नांवे असलेल्या धान्य दुकानाची तपासणी करण्यांत आली व त्यांचादेखील लेखी खुलासा घेवुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यांत येणार आहे.

# भैरवनाथनगर ते निमाणी बस सकाळी ६.३० वाजता सुरू, विद्यार्थी, कामगारांचा प्रश्न मार्गी

### शिवसेनेच्या मागणीला यश

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक महापालिका हद्दीतील जेलरोड - भैरवनाथ नगर, राजराजेश्वरी चौक हा परिसर झपाट्याने विकसित होत आहे. या परिसरातून मोठ्या प्रमाणात नाशिककडे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, नौकरदार वर्ग, व्यावसायिक जात असतात. परंतु या ठिकाणांहून नाशिककडे जाण्यासाठी सकाळी ७ वाजेच्या आत कोणतीही बस उपलब्ध नाही. प्रामुख्याने सकाळच्या वेळात शाळा व कॉलेजेस हे सकाळी ७ ते ७.३० दरम्यान सुरु होत असतात. त्या अनुषंगाने जेलरोड परिसरातून किमान १ बस हि सकाळी ६.३० वाजता असणे गरजेचे आहे अशी मागणी परिसरातील नागरिक करत होते. या अनुषंगाने शिवसेना उपमहानगर प्रमुख शिवा ताकाटे यांनी परिसरातील विद्यार्थ्यांची व नागरिकांची अडचण लक्षात घेऊन सिटी लिंकला निवेदन देऊन भैरवनाथ नगर ते निमाणी किंवा गंगापूर रोड ही बस सकाळी ६.३० वाजता सुरू करण्याची मागणी केली असता, त्यांची मागणी मान्य करून व विद्यार्थ्यांची व नागरिकांची अडचण लक्षात घेऊन सिटी लिंकने सकाळी ६.३० वाजता बस सुरू केली.

सोमवारी सकाळी ६.३० वाजता सिटी लिंकची बस क्रमांक १४८ चे स्वागत करून नारळ फोडून बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला. बसचे चालक व वाहक यांचे शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन स्वागत करून करण्यात आले. याप्रसंगी शितल ताकाटे, रघुनाथ घोलप, सदाशिव पाटील, अभिजित बनकर, नितीन भोळे, प्रमोद काशीकर, उमेश सोनार, धीरज पन्हाळे, रवी पेहेरकर, बाली धोंडगे, पियुष राऊत, नंदकिशोर निमसे, परेश चव्हाण, विशाल शेळके, प्रशांत मोरे, मयूर राहणे, विनोद वाघमारे, सौरभ जाधव व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्तित होते.

### अजनाळे शिवारात शेत रस्त्यांची मागणी

**धुळे ।** शासन आपल्या दारी या उपक्रमातून शासन नागरीकांपर्यंत पोचत आहे. परंतु, शेतक-यांसाठी होत असलेल्या उपाययोजना कुचकामी ठरत आहेत. शासन आपल्या दारी आले, परंतु आम्हाला शेतात जाण्यासाठी रस्ता नाही, अशी खंत शेतकरी महिलांनी व्यक्त केली. अजनाळे (ता. धुळे) येथे शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने शासनाने आमचे प्रश्न गांभीयनि घ्यावेत, अशी मागणी अनुसया भोसले या शेतकरी महिलेने केली. नागरीकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासनातर्फे शासन आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ही योजना सर्वसामान्य नागरीकांसाठी फायदेशीर आहे. तसेच शासनाने शेतक-यांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अजनाळेसह परिसरात नागरीकांना शेतीशिवारात जाण्यासाठी रस्तेच नसल्याने नाराजी आहे. शासनाने आमच्या मागण्यांचा विचार करावा, अशी मागणी शेतकरी महिला भोसले यांनी केली.

# एक सही संतापाची : मनसेच्या अभिनव उपक्रमाला हजारो नागरिकांचा प्रतिसाद

**नाशिक । प्रतिनिधी**




महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्ष अध्यक्ष राज ठाकरे तसेच पक्षाचे नेते तथा महाराष्ट्र नवनिर्माण विध्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्राच्या सत्ता संघर्ष आणि राजकारणामध्ये सध्या झालेला चिखल आणि देशाला दिशा दाखवणाऱ्या महाराष्ट्राला विरोधी पक्ष उरलेला नसताना राज्यातील सदर घडामोडींचा परिणाम राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना तथा सर्व वर्गातील जनतेवर होतो आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना आपले मत व्यक्त करण्यासाठी तसेच संताप व्यक्त करण्यासाठी मनसेच्या वतीने एक उत्कृष्ट व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले.

सध्याच्या राजकारणात होत असलेला चिखल बघता तुम्हला राग येतं नाही कां? तुमच्या मताला काही किंमत नाही कां? तुम्हाला चीड येतं नाही का? तुमचा संताप होता नाही का? आणि होत असेल तर.. एक सही संतापाची करा आणि व्यक्त व्हा... असा उपक्रम काल नाशिक शहरासह जिल्ह्यात मनसेचे प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, नाशिक शहराध्यक्ष दिलीप दातीर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या उपक्रमात शहरातील हजारो नागरिकांनी आणि विविध क्षेत्रातील जनतेने पुढाकार घेऊन आपला संताप व्यक्त केला. याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष ड.रतन कुमार इचम, सलीम मामा शेख, पराग शिंत्रे, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, जिल्हा उपाध्यक्ष अनंत सांगळे, मनोज घोडके, मनोज ढिकले, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, मनसे विद्यार्थी सेना प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, उपशहराध्यक्ष सचिन सिन्हा, अक्षय खांडरे, विजय अहिरे, संतोष कोरडे, भाऊसाहेब ठाकरे, विभाग अध्यक्ष साहेबराव खर्जुल, नितीन माळी, धीरज भोसले, प्रकाश शिंदे, धरम गोविंद, हर्षल कुलकर्णी, अभिजीत सांगळे व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एच.आर.पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**शिरपूर ।** शहरातील एच.आर.पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रम आरंभी विद्येची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य आर.बी. पाटील, पर्यवेक्षक जे. पी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. गुरुपौर्णिमा निमित्त विद्यालयात गुरूमहिमा कथाकथन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते इयत्ता आठवीच्या २९ विद्यार्थीनीनी सहभाग घेतला.

कथाकथन स्पर्धेचे परीक्षण विद्यालयातील शिक्षक एस. एस. ठाकरे, एम. डी. पाकळे यांनी केले. विजयी स्पर्धक गट १ प्रथम कल्याणी बन्सीलाल येशी, व्दितीय हिताक्षी राजेंद्र पवार, तृतीय मधुबाला यादव बुवा. गट २ प्रथम कृतिका रवींद्र बोरसे, द्वितीय उत्प्रेक्षा राजेंद्र सिसोदे, तृतीय अंजली सचिन ठाकरे यांनी स्पर्धेत यश मिळविले. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख आर. आर. रघुवंशी व विद्यार्थीनीनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन एस.जे.भामरे यांनी केले. आभार शीतल पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेकरीता सोनार मॅडम, व्ही. ई. सिसोदे, व्ही.सी. महाजन, बी.बी.लोहार, भूषण मोरे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# भडणे येथील रिक्षा चालकाचा मुलगा बनला बी एस एफ जवान

**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील रिक्षा चालक प्रकाश विश्राम पाटील यांचा एकुलता एक मुलगा भारतीय सैन्यात बीएसएफ मध्ये अमोल पाटील यांची निवड झाल्याबद्दल भडणे ग्रामस्थांनी सत्कार समारंभ आयोजित केला होता.



अमोल पाटील या मुलांनी आपले शालेय शिक्षण भडणे नवलनगर धुळे येथे पूर्ण करून एम एस सी पूर्ण करून देश सेवा करावी ही प्रगत इच्छा मनाशी बाळगून आर्मी नेव्ही बीएसएफ आधी भरतीमध्ये प्रयत्न करणे चालू ठेवले नियमित अभ्यास सकाळ संध्याकाळ व्यायाम स्पर्धा परीक्षेचे अभ्यास करून तयारी करणे दोन वर्षापासून चालू होती नुकतीच गुजरात राज्यातील गांधीनगर येथे बीएसएफ ची भरती होती. त्या भरतीत सीलेकशन होऊन त्याची बीएसएफ मध्ये निवड झाल्याने भडणे येथिल पहिला बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये ओबीसी जागेतुन भरतीत आहे. सध्या तरी एकच मुलगा गावातून भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. एका सामान्य कुटुंबातील रिक्षा चालकाचा मुलगा बीएसएफ मध्ये भरती झाल्याने गावकऱ्यांनी आनंद उत्सव साजरा केला.

या बद्दल भडणे ग्रामस्थांतर्फे सतीश विश्राम वाघ यांचे निवासस्थानी सत्कार समारंभ आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भडणे येथील सरपंच गिरीश पाटील भडणे येथील आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज माळी यांनी अमोल वाघ यांच्या शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक देवराम पाटील, अशोक वाघ, हिम्मत वाघ, संजय पाटील, विठोबा पाटील, सतीश पाटील, भैय्या पाटील, अतुल पाटील, ज्ञानेश्वर ठाकरे, गुलाब वाघ, डॉ राहुल तडवी, शिवराम पाटील, अभिनव पाटील, दादू पाटील, संजय चौधरी, आबा पाटील, नाना पाटील, कृष्णा पाटील, बापू ठाकरे, विजय वाघ, संजय वाघ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवराज बागुल यांनी केले.

**अमोल वाघ बीएसएफ जवान**

गावातील नव तरुणांना सैन्य भरतीसाठी मार्गदर्शन तसेच त्यांच्याकडून सैन्य भरतीसाठी कसा अभ्यास व सराव करावा याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षेचे पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करेण एकुलता एक असलो तरी देश सेवेसाठी सेवा करावी ही माझी बालपणापासून इच्छा होती आणि आज ति इच्छा भरती झाल्यामुळे पूर्ण झाल्याने मनाला समाधान वाटले असे देखील सांगितले.

# धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये विद्यार्थी मंत्रीमंडळाची स्थापना

**धुळे । प्रतिनिधी**

येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षासाठी (इन्व्हेस्टीटर सेरिमनी) विद्यार्थी मंत्रीमंडळाची स्थापना करण्यात आली.

इयत्ता ६ वी ते १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी व सर्व शिक्षकांनी विद्यार्थी मंत्रीमंडळ सदस्यांची निवड केली होती. ही निवड करताना उमेदवारांचा शाळेतील विविध उपक्रमातील सहभाग, शैक्षणिक प्रगती व त्यांच्यातील नेतृत्व गुण याचा चोखंदळपणे विचार करूनच मतदान केले होते.




यंदाचा सोहळा देखील हा अतिशय निराळ्या पद्धतीने म्हणजेच पालकाकडून पाल्याचा गौरव करून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांना पालकांच्या हस्ते शाळेतर्फे देण्यात आलेले सॅश व बॅच देऊन सन्मानित करण्यात आले. पालकांच्या हस्ते पाल्याचा सन्मान होत आहे हे पाहणे खरोखरच एक रंजक अनुभव होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील अक्षरा भामरे हिने केले. या समारंभात हेड बॉय या पदासाठी इयत्ता बारावीतील हरिकृष्णन एन. नायर, हेड गर्ल सृष्टी एच. मोराणकर यांची निवड करण्यात आली. इयत्ता अकरावी तील व्हाइस हेड गर्ल या पदासाठी नियती अग्रवाल, व्हाइस हेड बॉय प्रणित अरोरा, सांस्कृतिक कार्यक्रम मंत्री ग्रीशा अग्रवाल व व्हाइस सांस्कृतिक कार्यक्रम मंत्री इयत्ता नववी तील हर्षित पाटील, इयत्ता दहावीतील क्रीडामंत्री समर्थ घाडगे, व्हाइस क्रीडामंत्री इयत्ता नववीतील वर्धन देसरडा, इयत्ता दहावीतील असेम्ब्ली मंत्री ज्ञान मंत्री, असेम्ब्ली व्हाइस मंत्री इयत्ता नववीतील मयंक आहेरराव, इयत्ता दहावीतील सफायर हाउस मंत्री अर्णव लोखंडे, इयत्ता अकरावी कॉमर्स मधील प्रिफेक्ट ओम मंडन व मानसी जैन, व्हाइस हाउस मंत्री नववी मधील गुंजन मुंदडा, रुबी हाउस मंत्री इयत्ता दहावीतील ऋषभ सबद्रा, इयत्ता अकरावी मधील कॉमर्समधील प्रिफेक्ट शिवराज देवरे व स्पर्श शर्मा, व्हाइस हाउस मंत्री इयत्ता नववीतील यश अग्रवाल, इयत्ता दहावीतील टोपाझ हाउस मंत्री आदित्य सैदाणे, इयत्ता अकरावी कॉमर्स मधील प्रिफेक्ट रोहन जैन व अनुश्री शर्मा, व्हाइस हाउस मंत्री इयत्ता नववीतील चिन्मय देवरे, इयत्ता दहावीतील सखी माहेश्वरी एमरल्ड हाउस मंत्री, इयत्ता अकरावी तील प्रिफेक्ट साद मेमन व कुशल अग्रवाल, व्हाइस हाउस मंत्री, इयत्ता नववी तील चिरागअग्रवाल, संपादकीय मंडळ साठी मंत्री म्हणून इयत्ता नववीतील अंशुमन पाटील या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. या चारही हाउसचे विद्यार्थी व सर्व प्रतिनिधी यांनी निष्ठा, सत्यता, सन्मान व या शाळेचे आदर्श उद्दीष्ट उच्च स्तरावर ठेवण्याची शपथ घेतली. विद्यार्थी प्रतिनिधी सृष्टी मोराणकर व हरीकृष्णन नायर यांनी भाषणात विचार मांडत शिक्षक, व्यवस्थापनाचे आभार व्यक्त केले. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन, उपमुख्याध्यापिका रिचा तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनेश सोनी, सुकन्या घोष, भाग्यश्री देशमुख, विरेंद्र सैदाणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संयोजन केले. राष्ट्रगीताने समारंभाचा समारोप झाला.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# फुले, शाहू,आंबेडकरांच्या विचारांवर आपली वाटचाल कायम सुरुच राहील : ना. भुजबळ

















नाशिक
। राज्यातील शेतकऱ्यांचे, मजुरांचे, बेरोजगारांचे, महिलांचे, ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच राज्याच्या विकासासाठी आपले काम अविरत सुरु राहणार असून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आपली वाटचाल कायम सुरूच राहील असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मंत्री छगन भुजबळ यांनी केले.राज्याच्या मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री पदी शपथ घेतल्यानंतर मंत्री छगन भुजबळ हे काल पहिल्यांदा नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले. मुंबईतून सांताक्रुझ येथील निवासस्थान येथून नाशिककडे निघाल्यावर ठाणे, मुलुंड, मानकोली नाका, कल्याण जंक्शन राजनोली, वाशिंद, इगतपुरी, घोटी, रायगड नगर, शहरातील पाथर्डी फाटा येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटक्याची आतषबाजी करत फुलांचा वर्षाव करून वाजतगाजत जंगी स्वागत केले. त्यानंतर भुजबळ फार्म येथे जल्लोषात स्वागत झाल्यावर येथील कार्यालयात त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन उपस्थितांना संबोधित केले. यावेळी त्यांच्या समवेत माजी खासदार समीर भुजबळ व माजी आमदार पंकज भुजबळ हेही होते. यावेळी माजी खासदार देविदास पिंगळे, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, माजी आमदार जयवंतराव जाधव, संजय पवार, शिवराम झोले, नानासाहेब महाले, पंढरीनाथ थोरे, दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, आनंद सोनवणे, कैलास मुदलीयार, विष्णुपंत म्हैसधूने, मकरंद सोमवंशी यांच्यासह हजारोंच्या संख्येने नाशिक शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते स्वागतासाठी हजार होते.





CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. १० जुलै २०२३





# शहीद जवान मनोज मोरेंच्या पार्थिवावर शिरपूर वाघाडी येथे अंत्यसंस्कार















धुळे । मनोज माळी हे शिक्षण घेत असताना देशसेवा करण्याचे मनात ठाणले होते. दहावीनंतर त्यांनी सैन्य भरती मारली. चार वर्षांपूर्वी ते सैन्यात भरती झाले. तेव्हापासून देशसेवा करणे सुरू होते. तीन दिवसांपूर्वी ते दरीत पडले. यात त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे वाघाडी गावात शोककळा पसरली. आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत सिक्कीम येथे असताना मनोज माळी यांना वीरमरण आले. या जवानावर साश्रू नयनांनी धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात असलेल्या वाघाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शहीद जवान मनोज माळी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी धुळे जिल्हा पोलीस तसेच भारतीय सैन्य दलाच्या वतीने बंदुकीच्या २१ फैरी हवेत झाडून मनोज माळी यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय शहीद जवान मनोज यांना अंतिम श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी उपस्थित होता. सिक्कीम येथे एका ओपी पोस्टवर कार्यरत असताना अन्य जवानांसोबत मार्गस्थ होत असताना मनोज हे दरीत पडले. यात त्यांना वीरमरण आले. चार वर्षांपूर्वी भारतीय सैन्यात भरती झालेले जवान मनोज माळी यांना वयाच्या २५ व्या वर्षी वीरमरण आलं. जवान मनोज यांचे पार्थिव वाघाडी गावात आल्यानंतर फुलांनी सजवलेल्या रथातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. वाघाडी गावांमध्ये प्रत्येक घरासमोर रांगोळी काढून मनोज यांना आदरांजली वाहण्यात आली.

**ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील**